**प्रादेशिक  हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (पालघर जिल्हा)

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ८४/२०१९** **दिनांक १८/१०/२०१९** **कालावधी ५ दिवस**

**डॉ. प्रशांत बोडके,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०

| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १२/१०/२०१९ ते १८/१०/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक १८/१०/२०१९ सकाळी ८:३० पासून २३/१०/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१२/१०** | **१३/१०** | **१४/१०** | **१५/१०** | **१६/१०** | **१७/१०** | **१८/१०** | | **१९/१०** | **२०/१०** | **२१/१०** | **२२/१०** | **२३/१०** |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | **पाऊस (मिमी)** | १० | ३४ | ११ | २ | ७ |
| ३३.० | ३४.० | ३५.० | ३५.० | ३५.० | ३४.० | ३५.० | **कमाल तापमान (अं.से)** | ३३ | २८ | २८ | ३१ | ३२ |
| २५.० | २५.४ | २५.६ | २५.० | २५.६ | २३.४ | २५.० | **किमान तापमान (अं.से)** | २३ | २१ | २२ | २३ | २४ |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ० | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ८ | ८ | ८ | ८ | ८ |
| ८७ | ८४ | ८५ | ८१ | ६६ | ६३ | ७६ | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ७७ | ८४ | ८२ | ७५ | ७५ |
| ५१ | ५६ | ५१ | ५३ | ५६ | ४३ | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ५९ | ७५ | ७४ | ६२ | ५७ |
| १.९ | २.१ | १.३ | १.१ | २.९ | १.४ | १.८ | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | १०.२ | १२.२ | १२.४ | ६.४ | ६.३ |
| इ.उ. | वा.उ. | इ.उ. | प. | प. | प. | प. | **वाऱ्याची दिशा** | आ.पु. | पु. | पु. | . इ.पु. | इ |

| **पाऊस (मिमी) मागील आठवडयातील** | **पाऊस (मिमी) १/१/२०१९ पासून आजपर्यंत** | **पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा** |
|---|---|---|
| **०.०** | **४१५६.४** | **२३५९.६** |

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक १९ ते २३ ऑक्टोबर, २०१९ दरम्यान तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता असून आकाश मेघाच्छादित राहील. दिनांक १८ ते २४ ऑक्टोबर, २०१९ साठी कोंकण विभागासाठी पर्जन्यमानाचा विस्तारित श्रेणी अंदाज हा सामान्यपेक्षा जास्त राहील. सामान्य फरक वनस्पती निर्देशांक (NDVI) नुसार पालघर जिल्ह्यामध्ये वनस्पती निर्देशांक मध्यम स्वरूपाचा आणि प्रमाणित पर्जन्यमान निर्देशांक (SPI) नुसार सौम्य ओलावा स्थिती दर्शविण्यात आली आहे.**

| **पिक** | **अवस्था** | **कृषि सल्ला** |
|---|---|---|
| **भात** | **दाणे भरणे ते पक्व अवस्था** | • गरवे भात दाणे भरण्याच्या अवस्थेत असल्याने भात खाचरात पाण्याची पातळी ५ सें.मी. पर्यंत ठेवावी. निमगरवे भात पक्व होवू लागल्यास कापणी पूर्वी ८-१० दिवस भात खाचरातील पाणी बाहेर काढून टाकावे.<br>• पुढील पाचही दिवस पाऊसाची शक्यता असल्याने पाऊसाचा अंदाज घेवून तयार झालेल्या हळव्या भात पिकाची **सकाळच्या वेळेस** "वैभव" विळ्याच्या सहाय्याने जमिनीलगत कापणी करून लगेच मळणी करून साठवणी अगोदर २ ते ३ उन्हे देऊन धान्य वाळवावे.<br>• लष्करी अळीचा प्रादुर्भाव हळव्या भात जातींवर दिसून येत असल्यास पाऊसाचा अंदाज घेवून तयार झालेल्या हळव्या भात पिकाची त्वरित कापणी करून लगेच मळणी उरकून घ्यावी.<br>• भात पिकावर लष्करी अळीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने पिकाचे चांगले निरीक्षण करावे. भातखाचरात एकरी तीन ते चार पक्षी बसण्याचे थांबे उभे करावेत जेणेकरून पक्षी ह्या अळ्या नष्ट करतील. गवत काढून बांध स्वच्छ ठेवावेत. भाताच्या लोंब्या कुरतडून दाणे जमिनीवर गळलेले दिसून आल्यास तसेच सकाळी किंवा सायंकाळी भातखाचरात अळी/कोष प्रतिचुड १-२ याप्रमाणे आढळल्यास डायक्लोरव्हॉस ७६ टक्के प्रवाही १५ मि. ली. किंवा सायपरमेथ्रीन २५ टक्के प्रवाही ६ मि. ली. प्रति १० लिटर पाण्यातून सायंकाळी किंवा सकाळी लवकर वारा शांत असताना चुडाच्या बुंध्यावर पडेल अशी फवारणी पाऊसाची उघडीप असताना करावी. (**टिप :** सदर किटकनाशकास लेबल क्लेम नाही.) |
| **आंबा** | **पालवी** | • पारंपारिक पध्दतीने लागवड केलेल्या आंबा बागेमध्ये जुन्या अनुत्पादित झाडांची मध्य फांदी छाटणी व इतर मध्यम फांद्यांची विरळणी करावी. यामुळे झाडाला जास्त आणि खोलवर सूर्यप्रकाश उपलब्ध होऊन फळधारणेत वाढ होईल. तसेच खोडकिडीच्या प्रादुर्भाबाकडे बागेतील झाडांची नियमित पाहणी करावी. ही कीड झाडाची साल पोखरून आतील गाभा खाते. खोडकिडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी १५ एम. एम. पटाशीच्या सहाय्याने प्रादुर्भित साल काढून झाडातील खोड किडीला बाहेर काढून मारुन टाकावे. नंतर हा भाग क्लोरपायरीफॉस २० टक्के प्रवाही ५ मि. ली. प्रती १ लिटर या प्रमाणात द्रावण तयार करून प्रादुर्भित भाग द्रावणाने चांगला भिजवावा किंवा क्लोरपायरीफॉस २० टक्के प्रवाही १० मि. ली. + ५० मि.ली. रॉकेल खोडकीडीच्या छिद्रामध्ये ओतावे.<br>• ढगाळ व दमट वातावरणामुळे, आंब्याच्या नवीन येणाऱ्या पालवीवर तुडतुडे, शेंडे पोखरणारी आणि मिजमाशीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने पालवीचे किडींपासून संरक्षण करण्यासाठी लॅम्बडासायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. किंवा क्विनोलफॉस २५ टक्के प्रवाही २५ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पाऊसाची उघडीप असताना फवारणी करावी. |
| **चिकू** | **फळधारणा** | • पाऊसाची उघडीप पाहून चिकू बागेमध्ये आंतर मशागतीची कामे पूर्ण करून घ्यावी तसेच गळलेली फळे व पालापाचोळा गोळा करून जाळून नष्ट करावीत. |

| | | |
|---|---|---|
| **भाजीपाला रोपवाटिका** | **पेरणी** | • रब्बी हंगामासाठी रोपे तयार करण्याकरिता वाफसा स्थितीत जमिनीची मशागत करून ३ मी. लांब X १ मी. रुंद X १५ से.मी. उंचीच्या गादीवाफ्यावर प्रती चौरस मीटर ५ किलो शेणखत, ३५ ग्रॅम युरिया, १०० ग्रॅम सिंगल सुपर फॉस्फेट व २५ ग्रॅम म्युरेट ओफ पोटेश मिसळून भाजीपाला बियाण्यांची पेरणी करावी. रोपांची मर रोगापासून संरक्षण करण्याकरीता पेरणीपूर्वी ३ ते ४ दिवस वाफ्यावर १ टक्का बोर्डोमिश्रणाची भिजवण करावी तसेच थायरम किंवा कॅप्टन ३ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास चोळावे.<br>• भाजीपाला रोपवाटीकेस नियमित पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| • **टिप :** फवारणी पाऊसाची उघडीप असताना करावी. | | |
| **सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोलीयेथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसारतयार करून प्रसारित करण्यात आली.**<br>**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा** | | |